# राष्ट्रसंतांचा वैज्ञानिक दृष्टिकोण

**डॉ. जयदेवी माणिकराव पवार**
कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाबळगाव

महाराष्ट्रही साधुसंतांची वीर पुरुषांची भूमी आहे या भूमीला इतिहास आहे. ज्याला इतिहास असतो त्यांचा वर्तमान हा खूप दैदिप्यमान हि असतो. अशा या देदीप्यमान भूमीत अनेक समाजसुधारक, महात्मे होऊन गेले. या भूमीला पावन करण्याचे काम म. चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम या संतांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीत खूप मोलाचा वाटा आहे. एवढेच नव्हे तर आध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्याचे काम या संतांनी व संत मेळयातील अनेक वेगवेगळ्या जाती-धर्माच्या संतांनी केले आहे. अलीकडे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ही परंपरा आपल्या अलौकिक प्रतिभा शक्ती व अमृतमय वाणीतून कार्यरत ठेवली आहे. राष्ट्रसंतांचे प्रबोधन करण्याचे काम त्यांनी त्यांच्या साहित्यातून केले आहे. त्यांची रचना वांग्मयीन दृष्ट्या सकस व सरस आहे. मराठी व हिंदीतील हे साहित्य लोकशिक्षणाचे धडे देणारे आहे.

समाजप्रबोधनाचे प्रभावी व परिणाम कारक शिक्षण आहे. त्यांनी या शिक्षणातून विश्वबंधुत्वाची, कमकुवत घटकांच्या सक्षमीकरणाचे, जीवन विषयक व्यापक दृष्टिकोनाचे अधिष्ठान त्यांच्या या विचाराला आहे. ग्रामोध्दार व ग्रामोन्नती हा त्यांच्या कार्याचा विस्तारलेला परिग आहे.

### १.जीवन विषयक व्यापक दृष्टिकोन :-

राष्ट्रसंतांचा जीवनप्रवास हा कष्टमय होता. त्यांना जननिंदा व व वडिलांच्या खडक शिस्तीचा स्वभाव यांचा त्रास होता. त्या विरोधाला न डगमगता प्रबोधनाचे वप्र वर्तनाचे कार्य संपूर्ण जगाला त्यांनी वाटले.

"बहु दुखावलो विपरीत लोके व्यवहारी लागतो प्रपंचाचे कसोटी लागता सुवर्ण उजळे'बाहेरील मळ दूर जाती'

म्हणजेच जीवनातील संकटांना निर्भयपणे तोंड देत मातृभूमीला परकीयांच्या ताब्यातून सोडवण्यासाठी संकल्प त्यांनी केला होता.

### २.अंधश्रद्धेला विरोध :-

राष्ट्रसंतांनी श्रद्धा अंधश्रद्धा यांच्यातला फरक लोकांना सांगून अंधश्रद्धेला आपल्या साहित्यातून कडाडून विरोध केला. समाजात अज्ञान अंधश्रद्धा यातून लोकांची पिळवणूक मोठ्या प्रमाणात केली जाते व ती कोण कोणत्या प्रकारे होते हे त्यांनी आपल्या काव्यातून पटवून दिले आहे.

"ही बुवाबाजी भुलवी जना'भ्रष्ट करी ग्रामजीवना
फसवोनि भोळ्या-बापड्यांना'भलत्या छंदा लाविती '

राष्ट्रसंतांनी देवधर्माच्या नावाखाली अंधश्रद्धेचा थोतांड पणा समाजाला दाखवून दिला. देवाची कृपा लाभावी देवाने साक्षात दर्शन घडावे असे अनेकांना वाटते. त्यातून देवाला नवस बोलणे, पूजा-अर्चा केली जाते. कर्मकांड केली जातात नवस- सायस बोलले जाते. यातून अंधश्रद्धा वाढीस लागते.

मग तो असोत दुर्गुन, सद्‌गुन'याचा विचार करतो कोण?

अंधश्रद्धा प्रवाही लागून'तैसेचि चालती पुढे पुढे'यामुळे अंधश्रद्धेचा प्रवाहा वाढत जातो. ग्रामदेवतेतील देव देवळे अध्यायात ते म्हणतात, देव मानणारे लोक देवासाठी भांडण-तंटे करतात खोटे बोलतात याविषयी राष्ट्रसंतांनी,

देवाकरिता करुनी भांडणे, कोर्टकचेरी माझी जाणी
सत्य बोलतो म्हणून ई शपथ घेणे, देवादिकांचे

यामुळे जग हे नास्तिक होऊ लागली आहे. देव आहे तर चांगलेच घडले पाहिजे. पण लोक देवाच्या नावावर वाईट वर्तन करू लागले याचे वास्तव पूर्ण चित्र त्यांनी रेखाटले आहे. करण देव ही संकल्पना सृष्टीच्या चराचरात सृष्टीच्या निर्मितीची ची ही संकल्पना आहे. महात्मा फुलेंनी या निर्मिका लाच सृष्टीचा निर्माता त्यालाच देव म्हटले आहे.

**३.नव्या युगाची उभारणी:-**

देवधर्म कल्पनांची काजळी झाडून टाकली पाहिजे असे राष्ट्रसंत म्हणतात. युगप्रभात या ग्रंथात जिवंत राष्ट्रधर्म या लेखात ते म्हणतात, ईश्वराच्या नावाने काय घडते, कोण कसे वागतात याबाबत ते म्हणतात'ईश्वराचे नाव नितीवंताना विश्वव्यापी प्रेमानं कर्तव्य शुरू होण्याला मदत करतं नि त्याच नावानं ढोंगी लोक हवं तसं पाप करून सफाईने घर भरण्याची साधनाहि करतात.'

नवयुग निर्माण करण्यासाठी कर्तव्याची जाणीव करून दिली आहे. कर्म करत राहणे. नव्या युगातील साहित्य, व्याख्याने, कीर्तने, देवधर्माच्या कल्पना ह्या विज्ञानावर आधारित पाहिजेत. देवधर्म बाबतच्या वाढत्या अंधश्रद्धा, कर्मकांड, अंधविचारा वाढविणारे व्याख्याने कीर्तने धार्मिक उत्सव याला खतपाणी घातले जात आहे. तुकडोजी महाराज म्हणतात विज्ञान दृष्टीची कास धरण्यास सांगतात तेव्हाच विज्ञान युग निर्माण होईल व त्याला आपण नवयुग म्हणून

**४.मंदिर मन शांतीचा ठिकाण आहे:-**

पण या मनशांती ठिकाणी व्यापारी दलाल भ्रष्ट पण फसवा फसवी ही मोठ्या स्वरूपात वाढली मंदिरे,

क्षेत्रे दुकाने झाली'पूजा, कमाई करू लागली
दक्षिणा पात्रे पुढे आली पोटासाठी
मंदिर बांधती म्हशी गाई'घान दिसे ठाई ठाई कसली
पूजा, धूप-दीप ही? सारा धुवा तंबाखूचा'
स्त्रिया बापड्या मंदिरी जाती: अंधानुकरण ऐकती पोथी'
सर्व लक्ष रंजना प्रति'स्तिरतवे कोणी ऐकेना'

अशी मंदिराची दुरावस्था तुकाराम मांडतात.

५ मंदिर बांधणी ऐवजी गावोगावी वाचनालय, योगा विद्यालय, औषधालय, शाळा स्थापना, वैज्ञानिक प्रयोगशाळा करण्यास ते सांगतात. हा त्यांचा वैज्ञानिक मानवतावादी विचार आहे. मानवता विठ्ठलाची कास्ते धरतात.

**६ समाज सेवा हाच धर्म:-**

तुकडोजींनी मानवता धर्माची जोपासना करावी व वैज्ञानिक जाणिवा रुजवा वयात धर्माची मूळ समाजसेवा ही आहे. काम हाच देव भाव हाच देव असे आचरण करण्यास ते सांगतात.

वही धर्म होगा जो सबको इमान दे
वही धर्म होगा जो सबको खान-पान दे
वही धर्म होगा जो देश को बलिदान दे
वही धर्म होगा जो भुके को काम दे'

धर्म ही संकल्पना काम कार्य कर्तव्य जोडली आहे. धर्म पराक्रमाने व पुरुषार्थांची जगत असतो. श्रम आणि धर्म जगत असतो. धर्माच्या तीर्थयात्रेला जाणाऱ्यांना तुकडोजींनी आणि प्रश्न केली. संत सांगती ते ऐकत नाही, इंद्रियाचे ऐकतो

कीर्तनी मान डोलवित ओ परी'कोंबडी, बकरी खातो'
वडील जनाचे श्राद्ध कराया'गंगे माझी पिंड देतो'
खोटा व्यापार जरा ना सोडी, देव कसा पावतो'

मानवी जीवनातील दांभिक प्रवृत्तीवर लेखन केले आहे. दांभिकता हीच व्यक्तीच्या विनाशाला कारणीभूत असते व्यक्तीच्या दुःखाला ती निर्माण करते. गाव हेच तीर्थ समजून गावाचा विकास हे वृत्त स्वीकारण्यास त्यांनी सांगितले आहे.

**७ सत्य हाच देव:-**

देवी चांगुलपणाचे प्रतीक आहे. जिथे जिथे सत्य चांगुलपणा मानवतावादी दृष्टी तिथे तिथे देव असतो. "लाखेचा देव त्याला अग्निचं भेव'

मातीचा देव त्याला पाण्याचं भेव
सोन्याचांदीचा देव त्याला चोराच भेव

देवा अशानं भेटायचा नाही रे
देव बाजारचा भाजीपाला नाही'

हे भजन ऐकताना अंधश्रद्धेची काजळी नाहीशी होते नवविचारांची प्रचिती येते यातून राष्ट्रसंतांनी नवविचारांची पेरणी केली आहे आणि हीच पेरणी विज्ञानवादी दृष्टी निर्माण करू शकते.

**७ सामाजिक स्वास्थ्याची जपणूक:-**

समाजाची घडी निट बसविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टी बरोबर साहित्यही तसेच निर्माण झाले पाहिजे असे ते म्हणतात कारण साहित्य हा समाजाचा आरसा असतो समाजाचे प्रतिबिंब साहित्यात पडतात.

बिघडली घडी, घडी समाजाची कोण लावील वाट त्याची कुणाला चिंता आहे जगताची पहातो वाटा मी त्याची'

सदाचार असेल तरच सौख्य स्वास्थ्य लाभत असते कौटुंबिक अवनती रोखण्याचे कार्य साहित्य करीत असते समाजात पैसा मोठा होऊन माणुसकी संपते आहे हा विचार त्यांनी व्यक्त केला आहे साहित्यात समाज बदलाची ताकत असते अशा स्वरूपाचे लेखन साहित्यातून झाले पाहिजे सामाजिक घडी व्यवस्थित बसली पाहिजे समाजात दुराचार नको आचार सत्य यांचा वास असला पाहिजे.

कोण खाती लाचलुचपत'हो न उघडचि डाके देवी
अन्याय-अत्याचार वाढती पैशासाठी'

समाजात भ्रष्ट व्यक्तीचे आचरण वरचेवर मोठ्या प्रमाणात वाढतात असलेले चित्र त्यांनी मांडले आहे माणूस जन्मास आल्यानंतर त्याच्या अंगी मनुष्यत्व प्राप्त होते ते होणे गरजेचे असते जो माणूस स्वतःला सर्व समूहासाठी जगणे मरणे सत्य सत्य यांचे ज्ञान अनुभवतो तो खरा माणूस त्याच पद्धतीने मनुष्याला विज्ञानाचे ठोक अनुभवले पाहिजेत व अध्यात्माचे मुलतत्व ही त्याने आणखी बाळगले पाहिजे. मनुष्यात वाचे सार्थक पण देश धर्म व परिवारासाठी असावे. व्हिडिओ मी सर्वांसाठी आहे ही जाणीव सामर्थ्य निर्माण करीत असते. सामर्थ्य हे वरील गोष्टीतून आणखी येत असते.

मूर्तिपूजा ही मूर्ती साठी नसून मूर्ती माननीय पूर्व कर्तव्याची ज्योत आपल्या ठिकाणी निर्माण व्हावी यासाठी असते ती करताना आपण चिंतन केले पाहिजे आपल्या भावनेनेच कर्तव्यावर बुद्धी आरूढ होत असते. आपल्या वागण्यात बोलण्यात एक प्रकारचा आत्मविश्वास आत्मक विचार येत असतो. मूर्तिपूजा ही त्या व्यक्तीचे गुण अंगी येण्यासाठी असते. मूर्तीची पूजा नाही झाली तरी चालेल पण त्याचे गुण आपल्या अंगी आले पाहिजेत हे कार्य केले पाहिजे. मंदिरात गेलो नाही तरी चालेल पण गोरगरिबांच्या भुकेल्या तहानलेल्या गरजवंत यांची मदत करता आली पाहिजे. पारायणे निरर्थक आहेत पोथी तून अर्थ कडून काही शिकता येते का ते पाहिले पाहिजे अशा विचारातून माणूस उत्तम सामर्थ्यवान बनत असतो.

राष्ट्रसंतांनी वैज्ञानिक दृष्टी बाळगून शाळा प्रयोगशाळा व्यायाम शाळा काढायला सांगितल्या पण आज समाजात उलटी परिस्थिती पाहायला मिळते आहे. आपण पाहतो कितीही अडचणी ची जागा मंदिरासाठी दिली जाते. मंदिरात दान मोठ्या स्वरूपात येते पण शाळेला लोक जागा देत नाहीत जागा दिलीच तर बांधकाम नसते शिक्षण घेण्यासाठी येतात तेव्हा तेथे कोणत्याही सुविधा नसतात शाळेला देणगी स्वरूपात पैसे तर देतच नाहीत जर दिले तर पावती मागतात म्हणजे मंदिरात मात्र कोट्यावधी चे दान केले जाते ही आपल्या समाजव्यवस्थेची रीत बनली आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या विचारातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. पण खऱ्या अर्थाने समाजात बदल झाला का ते पाहिल्यानंतर आपल्याला खिन्नता आल्याशिवाय राहत नाही. म्हणजे हजारो वर्षापासून आणि एक संतांनी वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याचा प्रयत्न करूनही आपण आजही मोठ्या स्वरुपात कर्मकांडीच आहोत. हे प्रत्ययास आल्यावाचून रहात नाही.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) राष्ट्रसंत संत श्री तुकडोजी महाराज, युगप्रभात श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज आश्रम, ता. तीवसा जी अमरावती, तृतीय आवृत्ती गांधी जयंती.

२) सावरकर सुदाम (संपा) राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता, श्री गुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, गुरुकुंज आश्रम, ता तिवसा अमरावती.

३) राणा अशोक (संपा) राष्ट्रसंतांची भाषणे, जिजाई प्रकाशन जिजापूर (पुणे) जिजाऊ जन्मोत्सव 12 जानेवारी 2008

४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज: व्यक्ती आणि वांग्मय संपा. डॉक्टर बाळासाहेब जाधव, डॉक्टर प्रल्हाद भोपे